MHKO170007742021

रेग्युलर कब्जा क्रमांक ७८/२०२१

कु.इशान सचिन कोरे
विरुध्द
श्रीमती विमल सतीश कोरे

निशाणी २५ खालील आदेश पारीत.

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी त्यांचेविरुध्द झालेला ' एकतर्फा (Exparte)' आदेश रद्द होवून मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

२. प्रस्तुत अर्जाचे कामी प्रतिवादी क्र. क्र.१ ते ३ यांचे असे कथन आहे की, वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचेविरुध्द वाटपासाठी, ताकीदीसाठी तसेच हक्कज्ञापन होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्र.वादी नं क्र.१ हे वयस्क असून प्रतिवादी क्र. २ त्यांचे सोबत पुणे येथे राहणेस आहेत तसेच प्रतिवादी क्र. हे आडाणी असल्यामुळे त्यांना कायद्यातील ज्ञान नसलेमुळे त्यांना न्यायालयात हजर राहता आले नाही. परिणामतः प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द "एकतर्फा " असा आदेश झालेला आहे. सबब सदरचा आदेश रद्दबातल होवून मिळणेविषयी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादीस जास्तीत जास्त दंड करुन मंजूर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत प्रतिवादींचे मुखत्वे असे कथन आहे की, प्र.वादी क्र.१ हे वयस्क असून प्रतिवादी क्र.२ त्यांचे सोबत पुणे येथे राहणेस आहेत तसेच प्रतिवादी क्र.३ यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना नेमलेल्या तारखेस हजर राहता आले नाही. वादीने प्रतिवादीचा अर्ज जास्तीत जास्त दंडावर मंजूर करावा असे सांगीतले आहे.

५. प्रतिवादींनी विलंब दिवसागणीक स्पष्ट केलेला नाही. अर्जदाराने प्रस्तुतच्या अर्जासोबत शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे अर्जातील कथनांवर अविश्वास दाखविणे न्यायोचीत नाही. कोणत्याही पक्षकारास सामान्यतः दाव्यात हजर होवून त्याचा दावा अथवा बचाव मांडण्यापासून रोखता येत नाही. नैसर्गीक न्यायतत्वांच्या अनुशंगाने अर्जदारास त्याचा बचाव उलटतपास घेवून व पुरावा सादर करुन मांडण्याकरिता संधी देणे न्यायोचीत व संयुक्तीक आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. क्र.१ ते ३ यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द झालेस दाव्याचा गुणदोषावर निर्णय होणेस मदत होणार आहे तसेच त्यामध्ये वादीचे

कोणतेही नुकसान होणार नाही. नैसर्गीक न्यायतत्वानुसार  प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन त्यांना संधी देणे अत्यावश्यक होणार आहे. तसेच वादीला झालेल्या तसदीकडे दुर्लक्ष करता येणार नाही परंतू वादीला काही अंशी अर्जाचा खर्च(cost) दिल्यास त्यांचेवर पक्षपात होणार नाही.  सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे.

## आ दे श

१. अर्ज  मंजूर करणेत येत आहे, प्रतिवादी क्रमांक क्र.१ ते ३ यांचेविरुध्द झालेला दावा " एकतर्फा"  चालणेचा आदेश रद्द करणेत येत आहे.

२. प्रस्तुत प्रतिवादी  यांनी वादी यांना या अर्जाचा खर्च(cost) रक्कम रुपये ६००/-( सहाशेहे फक्त )द्यावा .

Digitally signed by MANE VAISHNAVI ROHAN
Date: 2025.01.22 11:53:36 +0530

दिनांक २१.०१.२०२५.

श्रीमती व्ही.आर.माने ,
दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पन्हाळा.